\\10.158.17.107\e\dc backup-30-03-2014\MHP-DC\DGP Appointment-2015\मुलाखतीचे पत्र.doc inward 8/05/30/15

# जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली (उपचिटणीस शाखा)

पत्ता-राजवाडा आवार,सांगली, दुरध्वनी क्र-0233-2373063, Email ID- dcbranchsangli@gmail.com

क्रमांक-गृह-1/कार्या-6/एमएजी-1/1450/2015

दिनांक 28 /05/2015

## आदेश

2/- जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता, तसेच सहाय्यक सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता, पदांसाठी सन 2015 मध्ये दिनांक 17/03/2015 ते 31/03/2005 या काळात अर्ज मागविणेत आले. त्यानंतर सध्या कार्यरत असलेल्या सहाय्यक सरकारी वकीलांसाठी वयाची अट 55 वर्षावरून 62 वर्षापर्यंत शिथिल करणेत आली व दि.15/04/2015 अखेर अर्ज दाखल करणेस मुदत वाढ देण्यात आली. वरील वाढीव कालावधीसह विहीत केलेल्या मुदतीत जिल्हा सरकारी वकील व सहायक सरकारी वकील पदासाठी एकुण 172 अर्ज प्राप्त झाले.

3/- प्राप्त अर्जांमध्ये काही अर्जदारांनी करपात्र उत्पन्नाचा रकाना कोरा ठेवला आहे. काही अर्जदारांनी No, Not applicable असे नमुद केलेले आहे. अर्जांचे छाननीमध्ये अर्जास आवश्यक (mandatory) बाबींचा छाननीवेळी विशेषतः विचार करण्यात आला. सर्व अर्जाची रितसर छाननी करून दिनांक 25/05/2015 रोजी पात्र-अपात्र उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. मूळ अर्जात नमूद केलेले अत्यंत आवश्यक व पर्यायी मुद्दे ठरविणेत आले. त्यामध्ये तीन वर्षाचे आयकर विवरण पत्र जोडणे अनिवार्य आहे, अशी अर्जातच स्पष्ट अट होती. त्यामुळे प्राप्त अर्जांपैकी जिल्हा सरकारी वकील व सहायक सरकारी वकील या पदासाठीचे एकूण 61 अर्जदार अपात्र ठविणेत आले.

4/- दिनांक 26/05/2015 व 27/05/2015 रोजी अपात्र यादीतील एकूण 11 अर्जदारांनी आमचे अर्जाचा फेर विचार व्हावा व तांत्रीक मुदयावर अर्ज फेटाळू नयेत अशी विनंती केली. प्रस्तुत अर्जदार यांचे अर्जाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव | विनंतीचे कारण |
|---|---|---|
| 1 | शिंदे अविनाश लक्ष्मणराव | माझे 3 वर्षाचे उत्पन्न टॅक्सेबल नसलेमुळे मी आयकर विवरणपत्र जोडलेले नाहीत. प्रस्तुतकामी आयकर विवरणपत्र मॅन्डेटरी नाही असे कळविले. |
| 2 | होमकर श्रीधर बाळकृष्ण | |
| 3 | सुहासे मधुकर मल्लाप्पा | |
| 4 | करमरकर चंद्रशेखर अरविंद | |
| 5 | शिंदे स्मीता बजरंग | |
| 6 | जाधव विजय सुदाम | मी पहिल्या वर्षासाठी करप्राप्त होत नव्हतो, म्हणुन मी आयकर भरलेला नाही. मी चालु 3 वर्षाचा आयकर भरणेस तयार आहे असे कळविले. |
| 7 | कोरे सुनील मारुती | माझे 3 वर्षाचे उत्पन्न टॅक्सेबल नसलेमुळे मी आयकर विवरणपत्र जोडलेले नाहीत. प्रस्तुतकामी आयकर विवरणपत्र मॅन्डेटरी नाही असे कळविले. |
| 8 | तेलंग वर्षा पुरूषोत्तम | तीन वर्षाचे आयकर विवरणपत्र सोबत सादर करणेत येत आहे. |
| 9 | देशपांडे विनायक मधुकर | प्रस्तुत अर्जासोबत आयकर विवरणपत्र मिळुन आलेले नाही म्हणुन सन 2014 -2015 चे आयकर विवरणपत्र सोबत जोडले आहे. असे कळविले. |
| 10 | धावते ज्ञानकुमार महावीर | माझे 2 वर्षाचे आयकर विवरणपत्र जोडलेले आहे. चालु वर्षाचे आयकर विवरणपत्र जोडलेले नव्हते कारण मी दि.26/03/22015 रोजी अर्ज सादर केला होता व चालु वर्षाचे आयकर विवरणपत्र भरणेस कालावधी होता. त्यामुळे मी चालु वर्षाचे जोडलेले नाही. असे कळविले. |
| 11 | गुजर सचिन सुभाष | माझे 3 वर्षाचे उत्पन्न टॅक्सेबल नसलेमुळे मी आयकर विवरणपत्र जोडलेले नाहीत. प्रस्तुतकामी आयकर विवरणपत्र मॅन्डेटरी नाही असे कळविले. |

...2...

5/-    वरील सर्व अर्जाचा विचार करून व अद्याप मुलाखती संपलेल्या नसल्यामुळे अर्जदार यांना तांत्रिक दृष्टया डावलणेत येऊ नये. त्यास संधी देण्यात यावी व नैसर्गिक न्याय तत्वाचा अंमल व्हावा या उद्देशाने वरील नमूद सर्व अर्जदारास मुलाखतीची संधी देण्यात यावी या निर्णयाप्रत मी आलो आहे. म्हणुन मी जिल्हाधिकारी सांगली खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

वरील सर्व अर्ज मान्य करण्यात येत आहेत व वर नमूद अर्जदार क्र. 1 ते 11 यांचे अर्ज त्यांनी अर्ज केलेल्या पदाकरीता पात्र ठरविणेत येत आहेत. त्यांना दिनांक 28/05/2015 रोजी सोयीच्या वेळी इतर मुलाखती बरोबरच संधी देण्यात यावी.

**ठिकाण** - सांगली

**दिनांक व वेळ** -28/05/2015, सकाळी -10.30 वा.

DISTRICT MAGISTRATE SANGLI

जिल्हाधिकारी सांगली

जिल्हाधिकारी, सांगली